# महत्त्वाची मार्गदर्शक सूचना

# पोलीस भरतीपूर्व लेखी परीक्षा ऑनलाईन प्रशिक्षण -2021

## POLICE PRERECRUITMENT- WRITTEN EXAM PREPARATORY ONLINE COACHING 2021

**अर्ज भरण्यापूर्वी खालील प्रमाणे नमूद महत्त्वाच्या बाबी निर्देशनास आणून देण्यात येत असून उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वी दक्षता घ्यावी व पात्रता असल्यास अर्ज करावा.**

**(Before Submitting On-line Application, the Applicant should carefully the Application Form for POLICE PRERECRUITMENT- WRITTEN EXAM PREPARATORY ONLINE COACHING. Keep all your necessary data handy, before you start filling the Application Form Online.)**

➢ **पात्रता (Eligibility):**

- उपरोक्त उपक्रम हा फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील उमेदवारांकरीता लागू आहे.
  (The applicant must belong to Maratha / Kunbi / Maratha-Kunbi / Kunbi-Maratha community. The candidate will be registered for online coaching only if he / she submit the Caste Certificate issued by the Competent authority.)

- अर्ज करणारा उमेदवार इयत्ता बारावी उत्तीर्ण किंवा शासनाने या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
  (Candidate applying should have passed Std.12th or passed any course which is approved to be equivalent to Std. 12th by Government of Maharashtra)

- वयाची अट: खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी १८ ते २८ वर्षे आणि आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ३३ वर्षे
  (Age criteria is 18 to 28 years for General category and 18 to 33 years for reserved category)

- **पोलीस भरतीसाठी आवश्यक पात्रता निकष तुम्हाला माहितच असतील: अर्ज भरण्यापूर्वीखालील प्राथमिक आवश्यक माहिती जरूर वाचा**

## पोलीस भरतीपूर्व लेखी परीक्षा

- राज्य पोलीस भरतीसाठी सर्वप्रथम उमेदवारांना लेखी परीक्षा द्यावी लागेल.
- मराठी भाषेत लेखी परीक्षा घेतली जाईल.
- लेखी परीक्षा हि १०० गुणांची असेल व त्यासाठी ९० मिनिटांचा वेळ असेल. लेखी चाचणीत किमान ३५ % ( ३३% मागासवर्गीय) प्राप्त उमेदवारांना शारीरिक चाचणीस पात्र ठरतील.

| लेखी परिक्षा (१०० प्रश्न १०० गुण) | |
|---|---|
| **विषय** | **गुण** |
| **अंकगणित** | २५ |
| **सामान्य ज्ञान व चालू घडामोडी** | २५ |
| **बुद्धीमत्ता चाचणी** | २५ |
| **मराठी व्याकरण** | २५ |
| **एकूण गुण** | १०० गुण |

## शारीरिक चाचणी

**शारीरिक चाचणी केवळ ५० गुणांची असेल. प्रथम लेखी चाचणी व नंतर शारीरिक चाचणी घेतली जाईल. लेखी चाचणीत किमान ३५% (३३% आरक्षित प्रवर्ग) प्राप्त उमेदवारांना शारीरिक चाचणीस पात्र ठरतील**

| शारीरिक चाचणी (पुरुष) | |
|---|---|
| १६०० मीटर धावणे | ३० गुण |
| १०० मीटर धावणे | १० गुण |
| गोळाफेक | १० गुण |
| एकूण गुण | ५० गुण |
| **शारीरिक चाचणी (महिला)** | |
| ८०० मीटर धावणे | ३० गुण |
| १०० मीटर धावणे | १० गुण |
| गोळाफेक (४ किलो) | १० गुण |
| एकूण गुण | ५० गुण |

| वयाची मर्यादा | |
|---|---|
| General Category | १८ ते २८ वर्ष |
| Reserved Category | १८ ते ३३ वर्ष |

**शारीरिक पात्रता**

| Physical Attributes | Female Candidates | Male Candidates |
|---|---|---|
| Height (उंची) | १५५ से.मी. (किमान ) | १६५ से.मी. (किमान ) |
| Chest (छाती) | — | छाती न फुगवता ७९ से.मी.(किमान)<br>छाती फुगवून - ८४ से.मी |

- अर्जदारांनी सर्व अटी , शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इत्यादी पात्रता तपासूनच अर्ज भरावा. ऑनलाईन फॉर्म मध्ये अर्जदाराने काळजीपूर्वक संपूर्ण, अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. एकदा भरलेली माहिती फॉर्म सबमिट केल्यानंतर पुन्हा बदलता येणार नाही. त्यामुळे अर्ज भरण्यापूर्वी उमेदवारांनी प्रथम ऑनलाईन फॉर्म व मार्गदर्शक सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात व तद्नंतर ऑनलाईन फॉर्म मध्ये तपशील भरावा. अर्ज ऑनलाईनद्वारेच करणे अनिवार्य आहे. अर्जाची हार्ड कॉपी ई-मेल/पोस्ट द्वारे स्वीकारली जाणार नाही.
  (Candidates are requested to FIRST READ THE FORM CAREFULLY AND THEN FILL THE DETAILS BEFORE SUBMITTING IT ONLINE. Once you submit the form, the details cannot be changed and no such request will be entertained. Only Online filled forms will be considered; no Hard copy of Form will be accepted by post/courier)

- केवळ ऑनलाईन फॉर्म भरल्यामुळे अर्जदार कोचिंगसाठी पात्र ठरणार नाही. अर्जाची छाननी करण्यात येईल व कोणत्याही टप्प्यावर अर्जदाराने अपूर्ण/खोटी/चुकीची माहिती दिल्याचे आढळल्यास सदर अर्ज रद्द करण्यात येईल.

  (Application submitted through On-Line does not imply that candidate is ELIGIBLE or has fulfilled all the criteria. The Application is subject to scrutiny. The same will be rejected if the applicant is found to be ineligible at any point of time.)

- भरलेल्या ऑनलाईन फॉर्मच्या पडताळणीनुसार उमेदवार पात्र असल्यास सदर उमेदवाराचे नाव सारथी, पुणे च्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.
  (Once candidate has submitted the online form, if eligible, as per candidates' online form details, the selected candidates' names will be announced on SARTHI, Pune website accordingly.)

- ऑनलाईन फॉर्म मध्ये उमेदवाराने खोटी किंवा चुकीची माहिती भरल्यास, सदर अर्जदाराची अर्ज रद्द करण्यात येईल; तसेच प्रवेश घेतल्यानंतर जर खोटी किंवा चुकीची माहिती भरल्याचे लक्षात आल्यास, सदर उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल
  (The application can be rejected, at any stage of the selection process, if any of the information submitted by applicant in online application is found to be false /incorrect. Also his/her candidature will be Cancelled / Terminated at any stage of the Selection/ Post Selection/ online coaching period, in case the submitted information is found to be false)

- **सारथी, पुणे मार्फत प्रायोजित सदर उपक्रम केवळ पोलीस भरतीपूर्व लेखी परीक्षा ऑनलाईन प्रशिक्षण -२०२१ पुरता मर्यादित आहे. या उपक्रमांतर्गत लक्षित गटातील पात्र उमेदवारांना नि:शुल्क ऑनलाईन कोचिंगचा लाभ मिळेल. अर्जाद्वारे पात्र व नोंदणी झालेल्या उमेदवारांना सारथी, पुणे मार्फत इतर कोणताही लाभ देय राहणार नाही व कोणत्याही स्वरुपाची इतर मागणी ग्राह्य धरली जाणार नाही. ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि.५/२/२०२१. अर्ज फक्त ऑनलाईनद्वारेच स्वीकारला जाईल.**
  (The Coaching sponsored by SARTHI, Pune is for ONLY POLICE PRERECRUITMENT- WRITTEN EXAM PREPARATORY ONLINE COACHING 2021. Candidates registered and declared eligible for POLICE PRERECRUITMENT- WRITTEN EXAM PREPARATORY ONLINE COACHING 2021 will be sponsored for only online coaching; the beneficiaries will not be entitled for any other monetary benefits from SARTHI, Pune also such demands or requests will not be entertained.Last date to fill Online form is 5/2/2021. Only Online filled forms will be accepted.)